ISSN 2278-8808 SJIF 2015: 5.403
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# मराठी माध्यमाच्या इयत्ता ८ वी च्या मराठी विषयाच्या पाठयपुस्तकातील अध्यापनात संगीत, नाटक, नृत्य आणि कला यांचा वापरकरता येणाऱ्या घटकांचे विश्लेषण

**Asst. Prof. Jadhav Pratibha Laxman &**
**Asst. Prof. Waghmare Jayashri Dattatrya** *(Page 117-122)*
*K.K.Wagh College of Education, Nashik Maharashtra, India*
*K.K.Wagh College of Education, Nashik Maharashtra, India*

**SRJIS IMPACT FACTOR SJIF 2015**: 5.401
**Date of Issue Release:** 04/03/2017,
**Volume**: SRJIS, Jan-Feb, 2017, 4/30

***ABSTRACT***

*प्रस्तुत संशोधनात इयत्ता ८ वी च्या मराठी विषयाच्या अध्यापनासाठी संगीत, नृत्य, नाटय व कला यांचा वापर करून अध्यापन अध्ययन प्रक्रिया कशी मनोरंजनात्मक व अभ्यासपुर्ण करता येवु शकते याचा उहापोह करण्याचा प्रयत्न केलेला आहे. अध्यापनासाठी वापरात येणाऱ्या अनेकविध पध्दतीमधील विदयार्थ्यांना स्वानुभवातुन दिले जाणारे ज्ञान हे चिरकाल स्मृतीत ठेवले जाते. आणि अध्यापनाचे नृत्य, कला, नाटय, संगीत हे क्षेत्र असे आहे, ज्यातुन विदयार्थी स्वत: ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करतो. व ते स्वानुभवातुन प्रकट करण्याचाही प्रयत्न करीत असतो. त्यामुळे प्राप्त ज्ञान चिरकाल स्मृतीत राहण्यास मदत होत असते. म्हणुनच उपलब्ध ज्ञान स्वानुभवातुन व्यक्त करून ते प्राप्त करणे व दृढ करणे व सर्जनशील विचारांच्या विकासाची कृती म्हणजेच नाटय, नृत्य, कला संगित यांचा अविस्कार होय. आपल्या सर्जनशील विचारांच्या विकासाची कृती म्हणजेच कला, संगित, नाटय व नृत्य होय. इयत्ता ८ वी च्या मराठीच्या पाठयपुस्तकात विदयार्थ्यांमध्ये अध्यापनातुन आत्मसात करावयाची जी उद्दीष्टये व जीवनकौशल्य दिलेली आहेत. ती जर खऱ्या अर्थाने विदयार्थ्यांमध्ये रूजवायची असेल आणि विदयार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवुन आणावयाचा असेल तर मराठीच्या अध्यापनात नृत्य, नाटय, संगीत व कला यांचा वापर होणे आवश्यक आहे. तो वापर कसा करावा? त्याचे विश्लेषण प्रस्तुत संशोधनात केले गेले आहे.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## प्रस्तावना

शिक्षण प्रक्रियेत अध्यापन प्रक्रियेस अत्यंत महत्वपुर्ण स्थान देण्यात आलेले आहे. कारण, या अध्यापन व अध्ययन प्रक्रियेवरच अध्यापनाच्या उद्दीष्टांची यशस्वीता अवलंबून असते. व उदिद्ष्टांची यशस्वीता म्हणजेच विदयार्थ्यांमध्ये त्या त्या स्तरावरील अभ्यासक्रमाच्या अध्ययनातुन होणारा वर्तन बदल होय. हा वर्तन बदलच विदयार्थ्यांमधील उद्दिष्टांची तसेच जीवन कौशल्यांचे आत्मसात करण्याची अनुभूती देत असतात व उदयाच्या सृजनशील आणि जबाबदार समृध्द नागरीक होण्याची ही तयारीच असते.

प्राथमिक स्तरावरील शेवटचा टप्पा व माध्यमिक स्तराची होणारी सुरूवात या अनुषंगाने इयत्ता ८वी च्या पाठयपुस्तकात विदयार्थ्यांचा जीवनाकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टीकोन व मी,

माझं, माझ्या पुरता ही कक्षा सोडून मनाच्या वैषविकिकरणाची प्रक्रिया सुरू व्हावी आणि मी व माझा देश यातुनच समृध्द नागरीकाकडे वाटचाल व्हावी, म्हणुन जीवनमूल्याधिष्ठीत असे हे पाठयपुस्तक परिपूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. व त्यासाठी पाठयपुस्तकांच्या स्वाध्यायांमध्ये पाठयांशाच्या आकलनाबरोबर मुलांची सर्जनशील अभिव्यक्ती भाषा समृध्दी, उपक्रमांची कृतीप्रधानता यावर अधिक भर दिलेला आहे. परंतु इयत्ता ८ वी च्या पाठयपुस्तकाची अध्यापनाच्या उद्दिष्ठांच्या पुर्तीसाठी केवळ स्वाध्यायांचा वापर करून चालणार नाही तर त्यासाठी प्रथम त्या उद्दिष्टांच्या पुर्ततेसाठी अध्यापनातुन सुरूवात होणे आवश्यक आहे. व त्यासाठी विदयार्थ्यांच्या कला गुणांना वाव देवुन त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अध्यापनात नृत्य, नाटय, कला, संगीत यांचा वापर करणे आवश्यक आहे. एकुणच विदयार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी म्हणजेच बौध्दीक, शारिरीक आणि मानसिक विकासासाठी त्यांना स्वानुभव देणे गरजेचे आहे. व त्यासाठी विदयार्थ्यांच्या बुध्दी, मन आणि हात (थ्री एच हेड, हर्ट ॲन्ड हॅन्ड) यांचा वापर अध्यापन — अध्ययन प्रक्रियेत करणे आवश्यक आहे. व हा वापर नृत्य, कला, संगीत, नाटय यातुनच होणे सहजच शक्य आहे. तेव्हाच विदयार्थी उपलब्ध ज्ञानाच्या सहाय्याने स्वानुभवातुन मिळणारे प्राप्त ज्ञान दृढ करून स्वत:चा अप्रत्यक्षरित्या सर्वांगीण विकास करू शकतो. आणि तेव्हाच शिक्षण प्रक्रियेचे उद्दिष्टये किंवा त्या त्या पाठयपुस्तकाची उद्दिष्टये साध्य होवु शकतात.

यावरून असे लक्षात येते की, मानसशास्त्रज्ञ गार्डनर यांनी मांडलेल्या बहुविध बुध्दीमत्तेच्या सिध्दांतानुसार ''व्यक्तीमध्ये असलेल्या गुणांनुसार विदयार्थ्याला जर योग्य पोषण मिळाले, तर विदयार्थ्यांचा सर्वांगीण विकास होवु शकतो.''

**आवश्यकता किंवा महत्व**

विदयार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे शिक्षण प्रक्रियेचे मुलभूत उद्दिष्टये आहे. इयत्ता ८ वी च्या पाठयक्रमात विदयार्थ्यांचे भाषिक कौशल्य विकसित करण्याचे प्रमुख उद्दिष्टये आहे. या उद्दिष्टयाबरोबर विदयार्थ्यांना शाळेत मिळालेल्या ज्ञानाचे उपयोजन प्रत्यक्ष जीवनात करता यावे यासाठी भाषिक कौशल्य व जीवन कौशल्य यांची सांगड घातलेली आहे. व म्हणुनच इयत्ता ८ वी च्या पाठयपुस्तकात उद्दिष्टांबरोबरच जीवनकौशल्यही नमुद करण्यात आलेली आहे.

बालकिशोर वयातुन तरूणाईकडे निघालेली हे इयत्ता ८ वी चे महत्वाचे वळण लक्षात घेवुन प्रस्तुत पाठयपुस्तकाची रचना केलेली आहे. भाषेचे पुस्तक हे मराठीचे पुस्तक न ठरता जीवनाचे संवेदनशील भरण पोषण व्हावे ही दृष्टी समोर ठेवुन या पाठयपुस्तकाचे संयोजन केले आहे. हे संयोजनच यशस्वी होण्यासाठी व तरूणाईकडे निघालेल्या व समाजातील समृध्द व जबाबदार नागरीक बनण्याची समज देण्याची सुरूवात करणारा हा टप्पा म्हणजेच इयत्ता ८ चा वर्ग होय.

मी व माझें ही कक्षा सोडून 'हे विश्वची माझे घर' हा सकारात्मक दृष्टीकोन प्राप्त करण्यासाठी विदयार्थ्यांना पाठयपुस्तकातील आशयातुन मिळणाऱ्या ज्ञानाचा स्वानुभव प्राप्त करून दिला तर, त्यांच्या मध्ये यशस्वी जीवनासाठीची असणारी समज वृध्दींगत होण्यास मदत होईल. व आपोआपच विदयार्थ्यांमध्ये पाठयांशाच्या अध्यापनाच्या उद्दिष्टांबरोबर जीवनकौशल्ये ही विकसित होतील. म्हणुनच त्यासाठी गरज आहे ती विदयार्थ्यांना जास्तीत जास्त आशय स्वानुभवातुन शिकविणे. व त्यांच्यामध्ये ज्ञान वृंध्दीगतेबरोबरच त्यांच्या जीवनकौशल्य विकसित करणे होय त्यातुनच पाठयपुस्तकाचे या अध्यापनाची ते उद्दिष्टय आपोआपच संपन्न होतील.

म्हणुनच, जीवनाच्या दृष्टीने महत्वाच्या वळणावर असणारा इयत्ता ८ वी च्या मराठी विषयाच्या अध्यापनासाठी अधिकाअधिक नृत्य, नाटय, कला व संगित यांचा अनुभव देणाऱ्या पध्दतींचा वापर करण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधनात सांगण्यात आला आहे.

**उद्दिष्टये**

१. इयत्ता ८ वी च्या पाठयपुस्तकातील आशयाचे विश्लेषण करणे.

२. इयत्ता ८ वी च्या पाठयपुस्तकातील प्रत्येक घटकाच्या अध्यापनासाठी वापरात येणाऱ्या अध्यापन पध्दतींचा शोध घेणे.

३. उद्दिष्ट पुर्ती व जीवनकौशल्य आत्मसात करण्यासाठी नाटय, कला, सगीत नृत्य यांच्या माध्यमातुन इयत्ता ८ वी च्या अध्यापनासाठी पाठयपुस्तकात दिलेल्या घटकांचे विश्लेषण करणे.

४. उद्दिष्टयपुर्ती व जीवनकौशल्य आत्मसात करण्यासाठी अध्यापनात वापरात येणाऱ्या नाटय,कला, संगीत, नृत्य यांचा उपयुक्ततेचा अभ्यास करणे.

**गृहीतके**

१. इयत्ता ८ वीच्या मराठी माध्यमाच्या मराठीच्या विषयाच्या पाठयपुस्तकातील आशयाच्या अध्यापनासाठी फक्त वर्णनात्मक, स्पष्टीकरणात्मक व कथनात्मक या पारंपारीक पध्दतींचा वापर करतात.

२. स्वानुभवातुन मिळणारे ज्ञान हे चिरकाल टिकणारे असते.

३. कला, नाटय, नृत्य, संगीत यांच्या शिक्षणातील म्हणजेच अध्यापनातील वापरामुळे आशयाचे दृष्टीकरण होण्यास मदत होते.

४. ज्ञानाचे दृष्टीकरण व ज्ञान चिरकाल स्मृतीत ठेवण्यासाठी घ्यावयाचा स्वानुभव यांचा अध्यापनातील उपयोग उद्दिष्टयपुर्तीसाठी महत्वपुर्ण आहे.

**नमुना निवड**

१. इयत्ता ८ वी च्या मराठी माध्यमाच्या मराठी विषयाच्या पाठयपुस्तकाची नमुना निवड सहेतुक पध्दतीने करण्यात आली.

**मर्यादा**

१. प्रस्तुत संशोधन हे मराठी माध्यमाच्या इयत्ता ८ वीच्या वर्गापुरतेच मर्यादीत आहे.

२. इयत्ता ८ वी च्या मराठी विषयापुरतेच मर्यादीत आहे.

३. मराठी माध्यमाच्या इयत्ता ८ वी च्या मराठी विषयाच्या पाठयक्रमापुरतेच मर्यादीत आहे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक तथा विश्लेषण पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.

**'मराठी माध्यमाच्या इयत्ता ८ वी च्या मराठी विषयाच्या पाठयपुस्तकातील अध्यापनात संगीत, नाटक, नृत्य आणि कला यांचावापर करता येणाऱ्या घटकांचे विश्लेषण'**

इयत्ता ८ वी च्या मराठी विषयाच्या पाठयपुस्तकात देण्यात आलेले सर्व गदय घटक हे वर्णनात्मक स्वरूपाचे आहे. व पदय घटक हे संदेशात्मक व आत्मसंवादात्मक व वर्णनात्मक स्वरूपाचे आहेत. पाठयपुस्तकातील गदय व पदय विभागासाठी स्पष्टीकरण, वर्णन, नाटय, नृत्य, कला यांचा अध्यापनासाठी वापर केलेल्या घटकांचे विश्लेषण पुढील प्रमाणे करण्यात आलेले आहे.

मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये आजही अध्यापनासाठी सर्व इयत्ता मध्ये व सर्व विषयांमध्ये पारंपारिक अध्यापन पध्दतींचा वापर केला जातो. व त्यासाठी इयत्ता ८ वी या मराठी विषयही अपवाद नाही. बहुतांशी शिक्षक इयत्ता ८ वी च्या मराठीच्या पाठयपुस्तकाच्या अध्यापनासाठी वर्णनात्मक, स्पष्टीकरणात्मक व कथनात्मक या पारंपारिक पध्दतींचा वापर करतात. परंतु अशा पारंपारिक पध्दतीमुळे प्राप्त ज्ञान विदयार्थ्यांच्या चिरकाल स्मृतीत राहीलच असे नाही. म्हणुन या पारंपारिक अध्यापन पध्दतीतुन संपुर्ण उद्दिष्टयपुर्ती व जीवनकौशल्ये आत्मसात होतातच असे नाही. म्हणुनच अध्यापन अध्ययन प्रक्रियेत जर गांधीजींनी स्विकारलेल्या शैक्षणिक विचारांमध्ये अनुचिंतन, आत्मनिरिक्षण कृती या तिन गोष्टींचा समन्वय साधतांना डोके, हदय व हात या तिन शारिरीक घटकांची प्रत्यक्ष मदत घेतली तर खऱ्या अर्थाने विदयार्थ्यांचा अध्यापन—अध्ययन प्रक्रियेत प्रत्यक्ष सहभाग नोंदविला जाईल. व त्यातुन मिळणारे ज्ञान वृध्दींगत होवून चिरकाल स्मृतीमध्ये राहील यात शंका नाही. म्हणुनच गांधीजींच्या शैक्षणिक विचारधारेनुसार अध्यापन अध्ययन प्रक्रियेत जर डोके, हदय व हात यांचा वापर करावयाचा असेल तर अध्यापनात नृत्य, नाटय, कला व संगित यांच्या प्रत्यक्ष वापरातुन विदयार्थ्यांचा प्रत्यक्ष सहभाग नोंदविला पाहीजे. कारण शैक्षणिक विचारवंताच्या

विचारांनुसार ''कलांचा विकास म्हणजेच शिक्षण होय''. त्या अनुषंगानेच इयत्ता ८ वी च्या मराठी पाठयक्रमातुन गदय व पदय अशा एकुण ३० घटकांपैकी जवळपास ७ घटक हे अनुक्रमे कला, नृत्य व संगीत यांच्या तसेच २० टक्के नाटय यांच्या माध्यमातून शिकविल्यास विदयार्थ्यांच्या आशय ज्ञानाबरोबरच अभ्यासक्रमाची उद्दिष्ट पुर्ती व विदयार्थ्यांचे जीवनकौशल्य विकसित होवु शकते.

इयत्ता ८ वी च्या मराठी विषयाच्या पाठयक्रमाचे ७५ टक्के घटक असे आहे जे डोके, हदय, हात यांचा वापर करून म्हणजेच नृत्य, नाटय, संगीत कला यांच्या वापरातुन शिकवु शकतात. त्यामुळेच येणाऱ्या स्वानुभवातुन पाठयक्रमाचे उद्दिष्ठ साध्य होईल व विदयार्थ्यांमध्ये जीवन कौशल्य विकसित होतील.

**निष्कर्ष**

प्रस्तुत संशोधनात आलेल्या निरिक्षणावरून पुढील प्रमाणे निष्कर्ष दिसुन येतात.

१. इयत्ता ८ वीच्या (मराठी माध्यम) मराठी विषयाच्या एकुण घटकापैकी (३० घटक) २३ टक्के घटक कलेच्या माध्यमातुन अध्यापन केल्यास अध्यापन अधिक प्रभावी होते.

२. इयत्ता ८ वी च्या मराठी विषयाच्या एकुण घटकापैकी ६६ टक्के घटक नाटयाच्या माध्यमातुन अध्यापन केल्यास अध्यापन अधिक प्रभावी होते.

३. इयत्ता ८ वी च्या मराठी विषयाच्या एकुण घटकापैकी २३ टक्के घटक संगित आणि नृत्याच्या माध्यमातुन अध्यापन केल्यास अध्यापन अधिक प्रभावी होते.

४. इयत्ता ८ वी च्या मराठी विषयाच्या एकुण घटकापैकी २३ टक्के घटक वर्णनात्मक किंवा स्पष्टीकरणात्मक पध्दतीत सुयोग्य आहे

यावरून असे लक्षात येते की, नाटय स्वरूपात अध्यापन केल्यास अध्यापन अधिक प्रभावी ठरते. त्यामुळे पाठयक्रमाचे उद्दिष्ट साध्य होतात. व विदयार्थ्यांकडून जीवनकौशल्य आत्मसात केली जातात.

**शिफारसी**

१. इयत्ता ८ वी च्या मराठी विषयाच्या अध्यापनासाठी जास्तीत जास्त नाटयीकरण या पध्दतीचा वापर करावा.

२. इयत्ता ८ वी च्या मराठी विषयाचे अध्यापन करतांना कला, नाटय, संगीत, नृत्य, संगित या पध्दतीचा वापर करावा.

३. इयत्ता ८ वी च्या मराठी विषयात वर्णनात्मक पाठांचे प्रमाण कमी करावे.

४. कला शिक्षणाद्वारे अध्यापन करण्यासाठी अभ्यासक्रमात कला, नाटय, संगीत, नृत्यांवर आधारीत पाठांचा समावेश करावा.

५. शाळेमध्ये कला शिक्षणाद्वारे अध्यापन करण्यासाठी सरकारने शैक्षणिक साधने व तंत्रे पुरविली पाहीजेत.

**संदर्भ**

*इयत्ता ८ वी चे मराठी माध्यमाचे पाठयपुस्तक, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळ, पुणे—४, जानेवारी २००९*

*शिक्षणतरंग, शैक्षणिक मासिक, संपादक डॉ. किशोर चव्हाण,*

*ऑगस्ट २०१६.*

*संशोधन पध्दती, वि. रा. भिंताडे, नित्यनुतन प्रकाशन, टिळकरोड, पुणे.*

*सप्टेंबर २००९.*

*मराठीचे आशययुक्त अध्यापन पध्दती, डॉ. सुरेश करंदीकर व डॉ. मीना मंगरूळकर, फडके प्रकाशन, कोल्हापूर, ऑगस्ट २००५.*